# Ulhasnagar municipal corporation
# उल्हासनगर महानगरपालिका
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर - ३

| दुरध्वनी क्र. | विस्तार क्र. | संकेत स्थळ. |
|---|---|---|
| ०२५१-२७२०११६-१२५ | २३२/२६८ | www.umc.gov.in |

जा.क्र.उमप/आवि/उप-आ/२८९/२०२२
दिनांक:- ११/०३/२०२२

## नोटिस/सूचना

प्रति,
सर्व निविदाकार व इतर

**विषय:- ई-निविदा क्र. २०२२_UMC_७६६९४३_१ निविदेचा दुसरा लिफाफा (Commercial bid) उघडण्यापुर्वी हरकती सादर करण्याबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०३ अंतर्गत येणा-या परीसरात दैनंदिन रस्ते सफाई फुटपाथ, सार्वजनिक ठिकाणे छोटी नाले/गटार सफाई, शौचालय सफाई, जंतुनाशक फवारणी व धुरळीकरण करणे या कामासाठी बाहय यंत्रणेमार्फत ८ वर्षाच्या कालावधीकरिता येणा-या स्वच्छता विभागा अंतर्गत दैनंदिन कामे करणेकरिता मनुष्यबळ (Manpower) व आवश्यक वाहने, साधन सामुग्री पुरवठा करुन कामे करणेबावत आरोग्य विभागा मार्फत ई-निविदा क्र. २०२२_UMC_७६६९४३_१ अन्वये निविदा मागविण्यात आली होती.

त्याअनुषंगाने ४ निविदाकाराकडून निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदाकारांनी त्यांच्याकडील अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवजाचा तपशील खालिल प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा पात्रता निकष | मे. अभिषेक कन्स्ट्रक्शन, ठाणे | मे. अशोक एंटरप्रायजेस, नवि मुंबई | मे. समिक्षा कन्स्ट्रक्शन, ठाणे | मे. कोणार्क इंन्फ्रास्ट्रक्चर, उल्हासनगर |
|---|---|---|---|---|---|
| १ | सदरकामी कंपनी नोंदणी ॲक्ट १९५६ अन्वये नोंदणीकृत संस्था किंवा प्रायव्हेट लिमीटेड कंपनी किंवा संस्था किंवा भागीदारी संस्था किंवा कामगार विभागाकडील नोंदणीकृत संस्था निविदा सादर करु शकतात. | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | निविदा फॉर्म फी भरलेल्या चलनाची प्रत. (प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र फी भरणे आवश्यक राहील.) तसेच निविदा फॉर्म फी वर १८% जीएसटी भरणे बंधनकारक राहील. | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | १% इसारा रक्कम भरणा केलेल्या चलनाची प्रत. | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | संस्थेच्या/संस्था मालकाच्या नावाचे पॅनकार्ड जोडणे आवश्यक आहे. | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | मागील तीन वर्षाचे वार्षिक वित्तीय उलाढाल सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | सदर संस्थेकडे कमीत कमी २०० लोकांचे मनुष्यबळ | आहे | आहे | आहे | आहे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता, उप आयुक्त यांचे असणे आवश्यक आहे. | | | | |
| ७ | सदर संस्थेकडे सनदी लेखापाल यांचे प्रमाणित केलेले मागील ३ वर्षात सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ रुपये १० कोटी नेटवर्थ असणे आवश्यक आहे. | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | ग्राहय गुमास्ता नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरतेवेळी अस्तित्वात असले पाहिजे. (नुतनीकरणासाठी केलेला अर्ज किंवा चलन ग्राहय धरण्यात येणार नाही.) | आहे | आहे | आहे | आहे |
| ९ | संस्थेच्या नावाने राज्य कामगार विमा योजना (ई.एस.आय.सी.) कार्यालयाकडील अद्यावत प्रमाणपत्र असणे आवश्यक असुन किमान एक वर्षातील ई.एस.आय.सी. रक्कम भरल्याचे चलनाच्या प्रति जोडणे आवश्यक राहील. | आहे | आहे | आहे | आहे |
| १० | संस्थेच्या नावाने भविष्य निर्वाह निधी (पी.एफ.) कार्यालयाकडील अद्यावत नोंदणी क्रमांक असणे आवश्यक असुन किमान एक वर्षातील भविष्य निर्वाह निधी (पी.एफ) आस्थापनेकडे भविष्य निर्वाह (पी.एफ) रक्कमभरल्याचे चलनाच्या प्रति जोडणे आवश्यक राहील. | आहे | आहे | आहे | आहे |
| ११ | सदर संस्थेकडे मागील ३ वर्षात सरासरी १५ कोटी रुपयांची उलाढाल झालेली असणे आवश्यक आहे. सदर उलाढाल हि MSW प्रायमरी/सेकंडरी कचरा कलेक्शन व वाहतूक किंवा रस्ते साफसफाई क्षेत्रात झालेली असलेली पाहिजे. | आहे | आहे | आहे | आहे |
| १२ | निविदाकारांवर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा दाखल नसल्याबाबतचे किंवा राज्यात/देशात कुठेही काळया यादीत टाकण्याची प्रक्रिया अंतिम झालेली नसल्याबाबतचे रु. ५०० /- चे स्टॅम्प पेपरवर शपथपत्र. | आहे | आहे | आहे | आहे |
| १३ | निविदाकारांच्या कालावधीत पुरवठा करण्यात आलेल्या मनुष्यबळाचा पगार दर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत देण्याबाबत रु. ५०० /- स्टॅम्प पेपरवर शपथपत्र. | आहे | आहे | आहे | आहे |
| १४ | निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे खरी असल्याबाबत शासनाने विहीत केलेल्या नमुन्यातील रु. ५००/- स्टॅम्प पेपरवर शपथपत्र. | आहे | आहे | आहे | आहे |
| १५ | व्यवसाय कर प्रमाणपत्र. | आहे | आहे | आहे | आहे |
| १६ | संस्थेचे महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकारी/कर्मचारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे सोबत कोणतेही हितसंबंध नसल्याबाबतचे रु. १०० /- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र. | आहे | आहे | आहे | आहे |
| शेरा | | पात्र | पात्र | पात्र | पात्र |

तरी पात्र झालेल्या निविदाकारांचा निविदेचा दुसरा लिफाफा (Commercial bid) उघडण्यापुर्वी अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवजा बाबत काही हरकत असल्यास सदरची नोटिस/सूचना प्रसिध्द झालेल्या दिनांका पासून दोन दिवसात कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर कराव्यात. दिनांक १५/०३/२०२२ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत हरकत प्राप्त न झाल्यास निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

उप-आयुक्त (आरोग्य)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत - १) सिस्टीम मॅनेजर, माहिती तंत्रज्ञान विभाग.
२/ सदरची नोटिस/हरकत महापालिका वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
२) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग.
२/ सदरची नोटिस/हरकत बोर्डावर प्रसिध्द करणेसाठी.

**प्रत:- माहितीस्तव.**

१) मा. आयुक्त,
२) मा. निविदा समिती अध्यक्ष व सह अध्यक्ष